| MHMM200055782026 | दाखल दिनांक | : | २३/०४/२०२६ | | |
|---|---|---|---|---|---|
| | नोंदणी दिनांक | : | २३/०४/२०२६ | | |
| | निकाल दिनांक | : | १०/०६/२०२६ | | |
| | कालावधी | : | वर्ष | महिने | दिवस |
| | | | ०० | ०१ | १८ |
| | **नि. क्र. ११** | | | | |

**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, १६ वे न्यायालय, बलार्ड पिअर, मुंबई**

*(पिठासीन अधिकारी श्रीमती रोहिणी सु. भोसले/नरसाळे)*

*(घोषित दिनांक १०/०६/२०२६)*

**संक्षित फौजदारी खटला क्र.७५३/२०२६**

(राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक मुंबई शहर, गुन्हा नोंद क्र.७१/२०२५)

| | | |
|---|---|---|
| **अभियोग पक्ष.** | ... | **निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क**<br>भरारी पथक, मुंबई शहर. |
| **अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता** | ... | **श्रीमती शालीनी घाडगे.** |
| | **विरुध्द** | |
| **आरोपी** | .... | श्री. सदाशिव बुदा मुलीया,<br>वय: ५८ वर्षे, व्यवसाय: मजुरी<br>रा: निलदुर्ग हॉटेल जवळ, मुक्ती नगर,<br>वामन तुकाराम पाटील मार्ग, घाटला, चेंबुर, मुंबई. |
| **आरोपीतर्फे विधिज्ञ** | ... | **श्री. दिलीप कोकीळ** |

**(फौजदारी आदेशिका प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(ii) अन्वये)**

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | : | २०/०६/२०२५ |
| गुन्हयाचा प्रथम खबरीचा दिनांक | : | २०/०६/२०२५ |
| दोषारोपपत्र दाखल केल्याचा दिनांक | : | २३/०४/२०२६ |
| आरोपीवर संपरीक्षा ठेवल्याचा दिनांक | : | २३/०४/२०२६ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | : | ०९/०६/२०२६ |

| | | |
|---|---|---|
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | : | निरंक |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | : | १०/०६/२०२६ |
| शिक्षा असल्यास, शिक्षा ठोठावल्याचा दिनांक | : | निरंक |

## आरोपीची माहिती

| आ.क्र. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हयाचे कलम | निर्दोष किंवा दोषी? | दिलेली शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. |
| १. | सदाशिव बुदा मुलीया | दोषारोपपत्रा सोबत हजर केले | २३ एप्रिल २०२६ | मुंबई दारूबंदी कायदा कलम ६५ (ई) अन्वये | निर्दोष | निरंक | निरंक |

**(फौजदारी आदेशिका प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(iii) अन्वये)**

**अभियोग/बचाव पक्षातर्फे घेण्यात आलेल्या साक्षीदारांची यादी**

**अ. – अभियोगपक्ष :**

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप | नि.क्र. |
|---|---|---|---|
| अ.सा.क्र.१ | श्री. रामचंद्र तानाजी पानगले | पंच | ०५ |
| अ.सा.क्र.२ | श्री. नरेश प्रल्हाद वडमारे | तक्रारकर्ता | ०७ |

**ब. – बचावपक्ष :**

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक | निरंक |

**क. – न्यायालयीन साक्षीदार :**

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक | निरंक |

## अभियोग/बचाव पक्षाच्या दस्तऐवजांच्या निशाणी क्रमांकांची यादी

अ. – **अभियोगपक्ष :**

| अ.क्र. | नि. क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | ६ | घटनास्थळ पंचनामा |
| २. | ८ | तक्रार |
| ३. | ९ | छापील पहिली खबर |

ब. – **बचावपक्ष :**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

क. – **न्यायालयीन निशाणी :**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

ड. – **महत्वाच्या वस्तू : (Material objects)**

| अ.क्र. | महत्वाचे वस्तू क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## न्यायनिर्णय

(*दिनांक १०/०६/२०२६*)

निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक, मुंबई शहर यांनी आरोपीविरूद्ध मुंबई दारूबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ई) प्रमाणे शिक्षेस पात्र अपराधाकरीता दोषारोपपत्र दाखल केले आहे.

२) अभियोग पक्षाचा पुरावा व त्यावर आरोपीने घेतलेला बचाव यांचा एकंदरीत विचार करून प्रस्तुत खटल्याच्या निर्णयांत पोहचण्याकरीता खालील मुद्दे माझे विचारार्थ येतात. त्यावर मी सुसंगत कारणमीमांसेसह निष्कर्ष नोंदवले ते खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १ | दिनांक २०/०६/२०२५ रोजी दुपारी ०२:४० वाजताचे सुमारास हॉटेल उडपी लॉजिंग शेजारी, पान बिडी शॉप, क्वे स्ट्रीट, दारुखाना, रे रोड, मुंबई येथे आरोपी विनापरवाना व बेकायदेशिररित्या भांगेची पिशवी स्वतःच्या ताब्यात बाळगून असतांना मिळून आला आणि अशा प्रकारे त्याने मुंबई दारूबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५ (ई) अन्वये शिक्षेस पात्र अपराध केला, असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय? | .. | नकारार्थी. |
| २ | आदेश काय ? | .. | अंतिम आदेशानुसार आरोपीलानिर्दोष मुक्त करण्यात येते. |

**कारणमीमांसा**

**मुद्दे क्र.१ व २ करिता** :-

**३)** अभियोग पक्षातर्फे आरोपीविरूद्ध आरोप सिद्ध करण्याकरिता पंच श्री. रामचंद्र तानाजी पानगले (अ.सा.क्र.१/नि.क्र.०५) व तक्रारकर्ता श्री. नरेश प्रल्हाद वडमारे (अ.सा.क्र.२/नि.क्र.०५) यांची साक्ष नोंदवली आहे.

**४)** अभियोग पक्षाच्या कथनाप्रमाणे तक्रारकर्ता श्री. नरेश प्रल्हाद वडमारे (अ.सा.क्र.२/नि.क्र.०७) हे घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असून प्रथम खबर देणारी आहे. त्यामुळे त्याची साक्ष महत्वाच्या भूमिकेत येते असल्यामुळे मी ती प्रथम विचारात घेते. त्याच्या साक्षीत असे आले आहे की, मिळालेल्या बातमीनुसार ते घटनास्थळी पोहोचली. आरोपीच्या

ताब्यात भांगेच्या गोळ्या मिळून आल्या. त्यामुळे त्याने शासनाच्यावतीने घटनेची तक्रार (नि.पी.०८) नोंदविली.

**५)** अभियोग पक्षातर्फे प्रथम खबर देणार याच्या साक्षीस पुष्टी देण्याकरीता प्रस्तुत खटल्यातील पंच साक्षीदार, श्री. रामचंद्र तानाजी पानगले (अ.सा.क्र.१/नि.क्र.०५) याला तपासण्यात आले. मात्र त्याने त्याच्या समक्ष आरोपीच्या ताब्यातुन देशी दारुच्या बाटल्या मिळून आल्याचे व त्या पंचनामा (नि.क्र.०६) प्रमाणे जप्त केल्याचे सांगितले.

**६)** अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या तक्रारकर्ता श्री. नरेश प्रल्हाद वडमारे (अ.सा.क्र.२/नि.क्र.०७) याची साक्ष विचारात घेता, असे दिसते की, त्याने अभियोग पक्षाच्या कथनाशी काही अंशी सुसंगत अशी साक्ष दिली आहे व आरोपीला ओळखत असल्याचे देखील सांगितले आहे. असे असले तरी, तक्रारकर्ता श्री. नरेश प्रल्हाद वडमारे (अ.सा.क्र.२/नि.क्र. ०७) याने आरोपीच्या ताब्यातून भांगेच्या गोळ्या जप्त केल्या बाबत कथन केले आहे. तर पंच साक्षीदार श्री. रामचंद्र तानाजी पानगले (अ.सा. क्र.१) याने आरोपीच्या ताब्यातुन देशी दारूच्या बाटल्या जप्त केल्या याबाबत कथन केले आहे. त्यामुळे अभियोग पक्षाच्या कथनावर संशय निर्माण होतो. तसेच अत्यंत महत्वाची बाब म्हणजे प्रस्तुत खटल्यात अभियोग पक्षातर्फे आरोपीकडून जप्त केलेला मुद्येमाल हा भांगच आहे, हे दाखविण्याकरीता सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळेकडील रसायन तज्ञाचा अहवाल अभियोग पक्षाने सदर खटल्याच्या कामी दाखल केला नाही.

**७)** शेवटी हे नमूद करणे गरजेचे वाटते की, अभियोग पक्षाला वारंवार संधी देवूनही अभियोग पक्षातर्फे प्रस्तुत खटल्यातील तपासी अंमलदार, मुद्देमाल वाहक व इतर स्वतंत्र अशा साक्षीदारांना तपासण्यात आले नाही. जप्त केलेला मुद्येमाल हा भांगच आहे, हे दाखविण्यासाठी सहाय्यक

वैज्ञानिक प्रयोगशाळेकडील रसायन तज्ञाचा अहवाल प्रस्तुत खटल्याच्या कामी सादर केला नाही. त्यामुळे केवळ साक्षीदारांच्या साक्षीवरून आरोपीवरील आरोप सिध्द होत नाही. म्हणून पटलावरील पुरावा हा आरोपीवरील आरोप सिध्द करण्यास अपुरा असल्याचे वाटते. परिणामी आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. सबब, मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी देते व खालील प्रमाणे आदेश पारित करते.

**–: <u>आदेश</u> :–**

१) आरोपी, श्री. सदाशिव बुदा मुलीया, याला मुंबई दारूबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५ (ई) अन्वये दंडनीय अपराधातून फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २५५(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येवून त्याला तात्काळ सोडून देण्यात येते.

२) आरोपीचे वैयक्तिक बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येते.

३) अपिलाची मुदत संपल्यानंतर व अपिल प्रलंबित नाही याची खात्री करून गुन्हयातील जप्त मुद्येमाल भांग नियमाप्रमाणे नाश करावी.

४) फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७-अ ची पूर्तता करतांना आरोपीने रुपये १,०००/- चे बंधपत्र व तितक्याच रकमेचा जामीन द्यावा.

न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by
ROHINI SUHAS
BHOSALE NARSALE
Date: 2026.06.10
19:25:19 +0530

ठिकाण : मुंबई

दिनांक : १०/०६/२०२६

**(श्रीमती रोहिणी सु. भोसले/नरसाळे)**
**१६ वे प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,**
**बलार्ड पिअर, मुंबई.**